
अस्सल सोलापुरी

# सुराज्य सोलापूर

## जिल्हा परिषद अन् पंचायत समितीसाठी शांततेत मतदान




**मंगळवेढा** : जिल्हा परिषद व पंचायत समिती मंगळवेढा सार्वत्रिक निवडणुकीसाठी शनिवारी शांततेत मतदान पार पडले जिल्हा परिषदेच्या ४ जागांसाठी तर पंचायत समितीच्या ८ जागांसाठी सरासरी ६५ टक्के मतदान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला .विविध मतदान केंद्रावर दुपारी दीड वाजेपर्यंत ३२.३९ मतदान झाले होते दुपारनंतर मात्र मतदानाच्या टक्केवारीवर परिणाम झाल्याचे दिसून आले. दुपारी दीड ते साडेतीन वाजेपर्यंत १५.२८ इतकेच मतदान झाले. एकूण मतदान ६५ टक्के अंदाजे झाल्याचे सांगण्यात आले. मतदानासाठी एकूण १२६४ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती २१७ पथकांची स्थापना करण्यात आली होती २१७ केंद्राध्यक्ष नेमणूक करण्यात आली होती .बॅलेट युनिट १८९ व कंट्रोल युनिट १८९ एकूण मतदान केंद्र १८९ होते तर २५ राखीव बॅलेट युनिट व कंट्रोल युनिट ठेवले होते.

मतमोजणी सोमवारी शासकीय धान्य गोदाम पंढरपूर रोड मंगळवेढा येथे होणार आहे.




# जि.प.च्या २० तर पं.स.च्या उमेदवारांचे भवितव्य यंत्रात बंद

## भाजपच्या प्रतिष्ठेची तर राष्ट्रवादीच्या अस्तित्वाची निवडणूक

**माढा/प्रतिनिधी**




माढा तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीमध्ये जिल्हा परिषद सदस्यासाठी ७ गटातील २० आणि पंचायत समिती सदस्यासाठी १४ गणातील ५० अशा एकूण ७० उमेदवारांचे भवितव्य मतदान यंत्रात बंद झाले. ही निवडणूक भाजपच्या प्रतिष्ठेची तर राष्ट्रवादीच्या अस्तित्वाची आहे. त्यामुळे सोमवारच्या निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. माढा तालुक्यात एकूण ६६.२ टक्के मतदान झाल्याची माहिती प्रशासनाने दिली. तालुक्यात १ लाख ३४ हजार ४४७ पुरूष, १ लाख २४ हजार २८२ महिला तर इतर ५ जणांचे मिळून एकूण २लाख ५८ हजार ३४ जणांनी मतदान केले.

सकाळी मतदानाचा वेग कमी होता मात्र दुपारनंतर महिलांसह मतदारांनी रांगा करून मतदान केंद्रावर गर्दी केल्याचे पाहायला मिळाले. ग्रामीण भागातील मतदारांनी सकाळी आपली सर्व कामे आटोपून लोकशाहीच्या या उत्सवांमध्ये सहभाग घेतला. वाड्यावर वृद्ध महिलांना आणण्यासाठी विशेष सोय केल्याचे पाहायला मिळाले.




**वाकाव : केंद्रावर मतदान करताना प्रा. शिवाजी सावंत आणि भाजपाचे उमेदवार पृथ्वीराज सावंत.**

माढा तालुक्यातील ही निवडणूक अतिशय चुरशीची आणि रंगतदार झाल्याचे पाहायला मिळाले. भाजपा आणि एकत्रित आलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांमध्ये याचबरोबर त्यांना साथ दिलेल्या शिवसेना वंचित बहुजन आघाडी आणि राष्ट्रीय समाज पक्ष यांच्यामध्ये चुरशीने झाली. या निवडणुकीमध्ये भाजपाचे माजी आमदार बबनराव शिंदे यांचे सुपुत्र रणजीतसिंह शिंदे, माजी आमदार धनाजीराव साठे, प्रा. शिवाजीराव सावंत यांच्या विरूद्ध राष्ट्रवादीचे आमदार अभिजीत पाटील, खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्यामध्ये झाली आहे. भाजपाच्या वतीने पालकमंत्री जयकुमार गोरे आणि राष्ट्रवादीच्या वतीने खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या सभांमधून आरोप प्रत्यारोपाच्या फेऱ्या प्रचारादरम्यान झडल्या होत्या. एकूणच माढा तालुक्याचे ही निवडणूक शिंदे- सावंत- साठे या प्रस्थापित तालुक्यातील राजकीय घराण्यांच्या प्रतिष्ठेची तर खासदार धैर्यशील मोहिते पाटील आणि आमदार अभिजीत आबा पाटील यांच्या आस्तित्वाची ठरणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. तालुक्यातील मानेगाव ,उपळाई बुद्रुक, मोडनिंब ,टेंभुर्णी, या जिल्हा परिषद मतदार संघात भाजप विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस अशी सरळ लढत झाली,. तर बेंबळे मतदारसंघात भाजप विरुद्ध शिवसेना शिंदे गट व कुर्डूवाडी भोसरे गटात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या विरोधात राष्ट्रवादी अजित पवार गट अशी सरळ लढत झाली. सकाळी साडेअकरा वाजेपर्यंत १७.८५% दुपारी दीड वाजेपर्यंत ३०.८३% व दुपारी साडेतीन वाजेपर्यंत ४५.६६% मतदान झाले. साडेपाचच्या आकडेवारीनुसार ६६.२ टक्के मतदान झाल्याचे निवडणूक प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले. निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी जयश्री आव्हाड, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी शिल्पा ठोकडे यांच्यासह तहसीलदार संजय भोसले निवडणुकी यंत्रणेसाठी काम करीत आहेत. निवडणूक निकाल सोमवार दिनांक ९ फेब्रुवारी रोजी जाहीर होणार आहे.

### मॉकपोल करतना मतदान यंत्रांमध्ये बिघाड

सकाळी तालुक्यातील काही केंद्रांवर मॉकपोल करत असताना मतदान यंत्रांमध्ये काही तांत्रिक बिघाड झाला मात्र तातडीने मशीन बदलल्याने पुन्हा मतदान सुरळीत पार पडले. मॉक पोल दरम्यान सहा बॅलेट युनिट व आठ कंट्रोल युनिट वेगवेगळ्या तांत्रिक अडचणींमुळे बदलण्यात आले तर मतदानादरम्यान चार बॅलेट युनिट बदलण्यात आले. वडोली, वाकाव, वाडाचीवाडी, व्हळे खुर्द, म्हैसगाव, गवळेवाडी, अरण, माळेगाव येथे सापटणे, तांबवे, बेंबळे, टेंभूर्णी, तुळशी, म्हैसगाव. कंट्रोल युनिट बदलण्यात आली.

### हे मातब्बर आहेत रिंणात

प्रा. शिवाजीराव सावंत यांचे सुपुत्र पृथ्वीराज सावंत, माजी समाज कल्याण सभापती शिवाजीराजे कांबळे, माजी बांधकाम समिती सभापती भारत आबा शिंदे, शिवसेना संपर्कप्रमुख संजय बाबा कोकाटे या मातब्बर नेत्यांचे भवितव्य मतदान यंत्रात बंद झाले आहे.

# सकाळी संथ; दुपारी जोशात झाले मतदान

## करकंबमध्ये वादावादीची घटना

**पंढरपूर/प्रतिनिधी**

पंढरपूर तालुक्यात ८ जिल्हा परिषद व १६ पंचायत समिती गणाच्या निवडणुकीसाठी शनिवारी मतदान प्रक्रिया पार पडली. सकाळी मतदान केंद्रांवर मतदारांचा प्रतिसाद काहीसा संथ राहिला होता. मात्र दुपारनंतर मतदारांचा उत्साह वाढल्याने मतदानाला चांगलाच वेग आला. निवडणूक यंत्रणेकडून सायंकाळी साडेपाचपर्यंत ६८.९१ टक्के मतदान नोंदवले गेले. या निवडणुकीत १ लाख ४ हजार ७५५ पुरुष मतदारांनी, तर ९२ हजार २२२ महिला मतदारांनी मतदान केले. पुरुष मतदारांची संख्या आघाडीवर असली तरी महिलांचा वाढता सहभागही निर्णायक ठरण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अनेक मतदान केंद्रांवर महिलांची सकाळपासूनच गर्दी दिसून आली.




**देगाव : येथे मतदानाचा हक्क बजावताना आमदार अभिजीत पाटील**

तालुक्यातील सर्व मतदान केंद्रांवर शांततेत मतदान व्हावे, यासाठी पोलिस प्रशासनाकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. बहुतांश ठिकाणी कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. त्यामुळे एकूणच मतदान प्रक्रिया सुरळीतपणे पार पडल्याचे चित्र दिसून आले.

### करकंब येथे अमर पाटलांचा पोलिंग एंजटासोबत वाद

करकंब येथे आ अभिजीत पाटील यांचे बंधू अमर पाटील हे बुथ केंद्रावर मतदान प्रतिनिधीशी भेटण्यासाठी गेले असता तेथे उपस्थित असणाऱ्या पोलींग एजंटसोबत वाद झाला. एकमेकांच्या अंगावर धावून जाण्याचा प्रकार घडला. रंतु तात्काळ पोलिसांनी हस्तक्षेप करीत अमर पाटील यांना मतदान केंद्राबाहेर काढले. त्यामुळे तेथील वाद टाळला आणि मतदान शांततेत पार पडले





दरम्यान, करकंब येथे मात्र काही काळ राजकीय तणाव निर्माण झाला. आमदार अभिजीत पाटील यांचे बंधू अमर पाटील आणि करकंब जिल्हा परिषद उमेदवार आदिनाथ देशमुख यांच्या समर्थकांमध्ये वाद झाला. या घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणली. त्यानंतर करकंब येथेही मतदान शांततेत पार पडले. पंढरपूर तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी पार पडलेल्या मतदानाने तालुक्यातील राजकीय वातावरण तापवले आहे. एकूण १ लाख ९६ हजार ९७७ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

# काका साठे, पवार, माने यांचे भवितव्य ईव्हीएममध्ये बंद?



**मार्डी : येथील मतदान केंद्रावर झालेली मतदारांची गर्दी.**




**उत्तर सोलापूर/प्रतिनिधी**

उत्तर तालुक्यातील ३ जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समितीच्या ६ जागांसाठी शनिवारी मतदान झाले. ३३ उमेदवारासाठी ६५.३३% मतदान झाले आहे. सोमवारी सकाळी १० वाजता सोलापूर शहरातील नू. म. वि. प्रशालेत मतामोजणी होणार असल्याची माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सदाशिव पडदुणे यांनी दिली.

उत्तर तालुक्यात ८८ हजार ९९२ मतदारांपैकी पुरुष.., महिला.. असे एकूण... मतदान झाले असून सरासरी.. ६५.३३% मतदान झाले. आता मतामोजणीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. बीबी दारफळ जिल्हा परिषद गटातून भाजपचे इंद्रजित पवार तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून बळीराम साठे यांच्यात लढत होत आहे. मार्डी गणातून उत्तर तालुक्याच्या भावी सभापतीची निवड होणार आहे. कोंडी गटात भाजपकडून पृथ्वीराज माने यांच्या विरोधात काँग्रेसचे उत्तर तालुकाध्यक्ष भारत जाधव, नान्नजमधून भाजपतर्फे चैताली मुळे व राष्ट्रादीचे प्रकाश चोरेकर यांच्यात लढत होणार आहे. यात बाजी कोण मारणार याकडे उत्तर तालुका वासियांचे लक्ष लागले आहे.


# राणी पाटील, केदार सावंत, यशराजेंचे नशिब ईव्हीएममध्ये बंद

## मतदान करून घेण्यासाठी कार्यकर्त्यांची पळापळ

**सांगोला/प्रतिनिधी**

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी सांगोला तालुक्यात सात जिल्हा परिषद व १४ पंचायत समिती गणांसाठी एकुन सरासरी ७१ टक्के एवढे मतदान झाले. आ. शहाजीबापू पाटलांची सून राणी पाटील, भाजपा जिल्हाध्यक्ष केदार सावंत, दिपक आबांचे पुत्र यशराजे यांचे नशिब ईव्हीएममध्ये बंद झाले.

७ जिल्हा परिषद गटात व १४ गणातील २७४ मतदान केंद्रावर रोजी ७० टक्के मतदान झाले. एकूण २ लाख ६२ हजार ३६७ मतदारांपैकी १ लाख ८३ हजार ६६२ एवढे मतदान झाले आहे त्यामध्ये ९४ हजार ९७२ पुरुष व ८८ हजार ४१४ महिला व इतर चार पैकी दोन मतदारांनी मतदानाचा हक्क बजावल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी बी.आर. माळी यांनी सांगितले. मतदान करून घेण्यासाठी कार्यकर्त्यांची पळापळ चालू होती. सर्वच मतदारसंघात चुरशीचे मतदान झाले तर मतदारांनी सर्वच बुथवर रांगा लावल्या होत्या







सांगोला तालुक्यात शांततेत व सुरळीत मतदान पार पडले. ९ फेब्रुवारी मतमोजणीच्या दिवशी कोण विजयाचा गुलाल उधळणार हे स्पष्ट होणार आहे. वयोवृद्ध मतदारांना आणण्यासाठी कार्यकर्ते धडपड करत होते. जवळा चोपडी व महूद या जिल्हा परिषद गटामध्ये मोठ्या चुरशीने मतदान झाले. भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतन सिंह केदार, माजी आमदार दीपक साळुंखे-पाटील यांचे पुत्र यश राजे साळुंखे पाटील हे जिल्हा परिषदेसाठी तसेच माजी आमदार शहाजी बापू पाटील यांची सून राणी पाटील उमेदवार म्हणून रिंगणात आहेत. मतदान पार पडल्यानंतर कोण विजयी होणार याबाबत आपापल्या कार्यकर्त्यांनी पैजाही लावल्या आहेत.




**सांगोला : मतदान केंद्रावर दीपकआबा साळुंखे-पाटील.**

# अक्कलकोटमध्ये निर्भय व मुक्त वातावरणात मतदान

## तालुका प्रशासनाचे यश; मतदारांचा सहभाग वाढला

**अक्कलकोट/प्रतिनिधी**

अक्कलकोट तालुका हा सर्वात मोठा मतदारसंघ असून ही राज्य निवडणूक आयोगाच्या आवाहनाला प्रतिसाद देत यंदा नवीन वर्षात तालुक्यात नगरपरिषद, जिल्हा परिषद व पंचायत समितीती निवडणुका मुक्त, निर्भय आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्यात तालुका प्रशासन यशस्वी झाले. तालुक्यातील मतदार राजांचा या लोकशाही उत्सवात उत्स्फूर्तपणे सहभाग वाढत असल्याचे चित्र पहायला मिळाले आहे.

तालुक्यातील महसूल, पंचायत समिती व पोलीस प्रशासनाच्या वतीने अथक परिश्रम घेत प्रत्येक अधिकाऱ्यांनी दक्ष राहून आणि समन्वय साधून काम केल्याने तालुक्यातील प्रत्येक गटात व गणात सर्वत्र शांततेत व नियोजनबद्ध निवडणूक कामकाज पार पाडण्यास मदत झाल्याचे अक्कलकोट चे तहसीलदार तथा निवडणूक निर्णय अधिकारी विनायक मगर यांनी सांगितले.



**अक्कलकोट : मतदान केंद्रावर महिलांचा उत्साह प्रचंड होता.**

अक्कलकोट तालुक्यातील ६ गट व १२ गणांच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी एकूण ५३ उमेदवार निवडणूक रिंगणात उभे आहेत. यापैकी जिल्हा परिषदेसाठी १८ तर पंचायत समितीसाठी ३५ उमेदवारांचे भविष्य मतदान पेटीत बंद झाली आहे. तालुक्यात एकूण २९० मतदान केंद्रावर ३२० पथके तयार करण्यात आले होते. यामध्ये प्रत्येक पथकात १ मतदान केंद्राध्यक्ष, ३ मतदान कर्मचारी, १ शिपाई व १ पोलिस यांचा समावेश होता. एकूण २७ क्षेत्रीय अधिकारी हे सर्व केंद्रावरील समन्वय म्हणून काम पाहत होते.

सध्या अक्कलकोट तालुक्यातील सहा जिल्हा परिषद गट व बारा पंचायत समिती गणाच्या निवडणूका यशस्वीपणे पार पाडण्यात तालुका प्रशासन यशस्वी झाले आहे.

या मुळेच तालुक्यातील सामान्य नागरिक ही तालुका प्रशासनाच्या या कामकाजावर समाधान व्यक्त करताना दिसून येत आहे. या संपूर्ण प्रक्रियेत तालुका प्रशासनाने योग्य संपर्क व समन्वय ठेवून काम केल्या मुळेच तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडणे शक्य झाले आहे.

### आचारसंहितेचे काटेकोर पालन

तालुक्यात कायदा व सुव्यवस्था उत्तम राखण्यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी विलास यामावार, अक्कलकोट दक्षिण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुरेश चिल्लावार, उत्तर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दिपक भिताडे यांनी ही वेळोवेळी पुरेसा पोलीस बंदोबस्त लावून व यंत्रणा सज्ज ठेवली. त्यामुळे तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या काळात कुठे ही गडबड गोंधळ न होता मुक्त व शांततेत मतदान प्रक्रिया पार पडली.

या निवडणुक कार्यक्रमात उमेदवारांचे अर्ज स्वीकारणे,उमेदवार अर्जाची छाननी, उमेदवार अर्ज मागे घेणे,कर्मचारी प्रशिक्षण, निवडणूक चिन्ह वाटप करणे, संवेदनशील, अतिसंवेदनशील मतदान केंद्रे, वाहतूक आराखडा, कंट्रोल युनिट, बॅलेट युनिट, मतदान केंद्र साहित्य वाटप नियोजन, मतमोजणी नियोजन, विविध समित्यांचे कामकाज आदी विषय तालुका प्रशासन उत्तमपणे राबविल्यानेच निवडणूक कामकाज सुरळीतपणे पार पाडणे शक्य झाले

**–विनायक मगर**, तहसीलदार